वन विभागाच्या प्रसिद्धी व माहिती शाखेसाठी मुख्यालय स्तरावर मुख्य कलाकार (Chief Artist) हे १ पद निर्माण करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन आदेश क्रमांक : ०५.२५/प्र.क्र.१२३/वने-८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
दिनांक: २३ जुलै,२०२६

संदर्भ:

१. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक एमएफएस-२०१७/प्र.क्र.७७/फ-८, दि. १३.०९.२०१९

प्रस्तावना:-

वन विभागातील पदांचा सुधारीत आकृतीबंध संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आला आहे. त्यामध्ये वन विभागाच्या प्रचार व प्रसिद्धी कार्यासाठी अधिसूचित असलेले चित्रकार/ कलाकार(Artist) (वेतनश्रेणी एस-१०: २९२००-९२३००) हे पद मृत संवर्ग म्हणून घोषीत केलेले आहे. सदरहू संवर्गामध्ये आजमितीस १ पद कार्यरत आहे. चित्रकार/ कलाकार हे पद मृत संवर्ग घोषीत केलेले असल्याने तसेच, वन विभागाच्या प्रचार व प्रसिद्धी कार्यासाठी, पर्यावरण जनजागृती, नकारात्मक बातम्यांचे खंडन तसेच प्रभावी ऑडिओ-व्हिडिओ संदेश निर्मितीसाठी मुख्यालय स्तरावर एका तज्ज्ञ पदाची आवश्यकता असल्याने प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), नागपूर या कार्यालयात “मुख्य कलाकार” (Chief Artist) (वेतनश्रेणी एस -१५: ४१,८०० - १,३२,३००) हे नवीन पद निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

शासन निर्णय :-

वन विभागाच्या प्रचार व प्रसिद्धी कार्यासाठी प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), नागपूर या कार्यालयात मुख्य कलाकार (Chief Artist) (वेतनश्रेणी एस-१५ : रु. ४१,८०० - १,३२,३००) हे ०१ नवीन पद निर्माण करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर पदनिर्मितीने, सध्या मृत संवर्गातील चित्रकार/ कलाकार पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यास / अधिकाऱ्यास नवनिर्मित मुख्य कलाकार (Chief Artist) गट-ब या पदावर नियुक्ती देण्यात आल्यानंतर मूळ चित्रकार/कलाकार पद आपोआप व्यपगत होईल.

३. सदर संवर्गाचे सेवाप्रवेश नियम व वन विभागाच्या दि. १३.०९.२०१९ च्या आकृतीबंधात सुधारणा स्वंतत्रपणे करण्यात येईल.

४.	मुख्य कलाकार हे पद मुख्यालयात प्रसिद्धी व माहिती शाखेत असेल व त्यांचे नियंत्रण अधिकारी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (माहिती तंत्रज्ञान व धोरण), महाराष्ट्र राज्य हे असतील.

५.	सदर शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभागाने दिलेल्या अभिप्रायानुसार अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग यांच्या अध्यक्षतेखालील उप समितीने दि.१५.०४.२०२६ रोजीच्या बैठकीत व मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय सचिव समितीने दि.०४.०६.२०२६ रोजीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६.	सदर शासन आदेश, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०२६०७२३१३०९२२६८४० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SAPKAL PRASHANT PRALHAD

Digitally signed by SAPKAL PRASHANT PRALHAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=C2EC242CAEF55E035A22245B60A2752C90753E697F5E56596B3524D34280A891, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9548CB33E24729A59B6A5C72EE905604BA53420C8EACFD34E9E8C2460B8AA409, cn=SAPKAL PRASHANT PRALHAD
Date: 2026.07.23 13:10:26 +05'30'

(प्रशांत सपकळ)
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन

प्रत सादर :

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. उप मुख्यमंत्री (नगरविकास विभाग) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण आणि अल्पसंख्याक विकास) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा. मुख्य सचिव यांचे सह सचिव, मंत्रालय, मुंबई
७. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
८. अपर मुख्य सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
९. प्रधान सचिव (ले व को / लेखा व कोषागारे), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१०.प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
११.प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर
१२.प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१३.प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
१४.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक), महाराष्ट्र राज्य, नागपूर
१५.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर
१६.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (माहिती तंत्रज्ञान व धोरण), महाराष्ट्र राज्य, नागपूर
१७.महालेखापाल - १/२ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
१८. निवडनस्ती वने-८ कार्यासन